# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

सहा. आयुक्त एम/पूर्व विभाग यांचे कार्यालय, २०३, २ रा मजला, एम/पूर्व विभाग कार्यालय इमारत,
कै. मधुकर तुकाराम कदम मार्ग, दुर्गादेवी चौक, गोवंडी (प), मुंबई - ४०००४३.

क्र. स. आ./एम-पूर्व/ ६१४ /जन/स.अ.(परि-१) दि.११ / ०६ / २०२६.

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती</u>

**विषयः**- एम/पूर्व विभागातील प्रभाग क्र. १३९ मधील प्लॉट क्र. ०८, दुर्गा सेवा संघ येथील दुर्गा माता मंदिराजवळ असलेली बालवाडी अनुज्ञा व अनुज्ञाप्ती तत्वावर परिरक्षण आणि व्यवस्थापना करिता पात्र संस्थेकडून स्वारस्याची अभिव्यक्ती मागविण्याबाबत

**खाते :-** सहायक आयुक्त एम/पूर्व विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागातील प्रभाग क्र. १३९ मधील प्लॉट क्र. ०८, दुर्गा सेवा संघ,गोवंडी, मुंबई येथील दुर्गा माता मंदिराजवळ असलेली बालवाडी नागरिकांच्या सोयीकरिता मनपा मार्फत बांधण्यात आली आहे. सदर बालवाडी ही प्रचलन, व्यवस्थापन व परिरक्षणाकरिता निवळ तदर्थ तत्वावर ११ महिन्यांच्या कालावधीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत असलेल्या व बालवाडी केंद्र चालविण्याचा अनुभव असणा-या अशासकीय सामाजिक संस्थेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| स्वारस्य अभिव्यक्तीच्या प्रस्ताव अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा विस्तृत नमुना व त्यासंबंधीची माहिती उपलब्ध असलेले संकेतस्थळ | http://portal.mcgm.gov.in |
| सदर नमुना संकेतस्थळावर उपलब्ध असण्याचा कालावधी | दि.१५/०६/२०२६ ते दि.३०/०६/२०२६ |
| स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी | दि. १५/०६/२०२६ ते दि. ३०/०६/२०२६ |

स्वारस्याच्या अभिव्यक्तीचा प्रस्ताव विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे प्रस्ताव कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त एम/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

-सही-
दिनांक ११/०६/२०२६
**सहायक आयुक्त 'एम/पूर्व' विभाग**

स्वयंसेवी संस्थेने भरावयाची माहिती व सोबत जोडावयाच्या कागदपत्रांचा तपशील :-

| अ.क्र. | तपशील | संस्थेने भरावयाची माहिती | सादर केलेल्या माहितीचे पुरावे |
|---|---|---|---|
| १ | धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात संस्था नोंदणी अधिनियम त्याचप्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 या दोन्ही अधिनियमा अन्वये मागील पाच वर्षापासून ( अर्ज मागविण्याच्या दिनांकापूर्वी ) नोंदणीकृत प्रमाणपत्र तसेच मूल्यमापनाकरिता जास्तीत जास्त जुनी नोंदणी असल्याचे नोदणीकृत प्रमाणपत्र | | |
| २ | अर्जदार संस्थेची मागील 03 वर्षाच्या कालावधीमधील किमान वार्षिक उलाढाल रु.१,00,000/- ( रुपये एक लाख ) किंवा त्यापेक्षा जास्त. तथापि सदर उलाढाल संस्थेच्या पुढील आर्थिक वर्षाच्या प्रस्तावित खर्चाच्या 50% पेक्षा कमी नसावी. मागील 03 वर्षाच्या कालावधीकरिता सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद सोबत सादर करावा. | | |
| ३ | सदर संस्थेचा बालवाडी प्रचलन व व्यवस्थापन करण्याचा अनुभव कागदपत्रांच्या पुराव्यासह नमूद करणे आवश्यक असेल. पात्रतेकरिता कमीत कमी ०३ वर्षाचा अनुभव विचारात घेतला जाईल. तसेच बालवाडी केंद्र चालविण्याचा ०३ वर्षाहून अधिक कालावधीचा अनुभव असल्यास त्यानुसार मुल्यमापन केले जाईल. | | |
| ४ | शासनाने / न्यायालयाने सदर संस्थेला काळ्या यादीत समाविष्ट केले नसल्याचे प्रतिज्ञापत्र जोडण्यात यावे. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | सदर संस्था विषयांकित बालवाडी स्थित असलेल्या ठिकाणापासून खालील प्रमाणे कोणत्या प्रवर्गात येते त्याचा तपशील<br>१) मतदार प्रभागाच्या हद्दीतील नोंदणीकृत संस्था<br>२) प्रशासकीय विभागातील नोंदणीकृत संस्था<br>३) लगतच्या विभागातील नोंदणीकृत संस्था<br>४) परिमंडळातील नोंदणीकृत संस्था | | |
| ६ | संस्थेची निपुणता -<br>१) संस्था चालवित असलेल्या बालवाडी केंद्राचे लाभार्थी ( ३ वर्षातील आकडेवारी )<br>२) प्रमाणपत्रे / पारितोषिके<br>३) प्रशिक्षित कर्मचारी | | |
| ७ | संस्थेचे सादरीकरण | | |
| ८ | संस्थेचा मेल आयडी, पॅनकार्ड, वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ९ | संपर्काकरिता अधिकृत व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक | | |

मी निम्वस्वाक्षरीकार श्री. / श्रीम.------------------------------------------------------------------ वय------------याद्वारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंडसंहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्याअनुसार मी शिक्षेस पात्र राहील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

**(अधिकृत व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी)**